<table>
<tr><td>MHKO190001082018</td><td><u>निशाणी क्र.३५ खालील आदेश</u><br><u>नियमित दिवाणी दावा क्र.२२/२०१८</u><br><u>श्री.तानाजी पांडूरंग पाटील वि.. श्री.आनंदा कुंडलिक पाटील व.६</u><br>(दिनांकः०३/११/२०२३)</td></tr>
</table>

१. वादीं यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० नुसार दाव्यात आवश्यक पक्षकार यांना समाविष्ट करण्यास परवानगी मिळणेकरीता व दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. प्रतिवादीं तर्फे सदर अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल करण्यात आले व सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

३. प्रस्तावित वादी क्र.३ या प्रस्तुत प्रकरणात हजर झालेल्या आहेत. परंतु त्यांनी म्हणणे दिले नाही व हरकत घेतली नाही. प्रस्तावित प्रतिवादी क्र.६(अ) यांना नोटीशीची बजावणी होऊनही त्या या प्रकरणात हजर झाल्या नाहीत व त्यांनी अर्जास हरकत घेतली नाही.

४. प्रतिवादीं तर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीं व त्यांचे वकील पुकारले असता गैरहजर.

५. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले. वादीं यांनी प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापन व कायम मनाई आदेश मिळणेकरीता दाखल केलेला आहे. वादीं यांनी प्रस्तुत अर्जात असे कथन केले की, त्यांनी दाव्यासोबत वंशावळ दाखल केलेली आहे. परंतु त्यामध्ये वादीं यांची बहीण शोभा संजय कातकर हिचे नावाचा उल्लेख करणेचे अनावधानाने राहुन गेले आहे. त्याअनुषंगाणे वादी दाव्यात दाखल केलेल्या वंशावळमध्ये दुरूस्ती करु इच्छीतात.

तसेच शोभा कातकर ही वादी यांची बहीण असलयाने तिला प्रस्तुत दाव्यात वादी क्र.३ म्हणुन सामील करणे देखील आवश्यक आहे. तसेच यातील प्रतिवादी क्र.५ व ६ यांची आई श्रीमती वालूबाई नाना पाटील या देखील प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार असल्याने त्यांना प्रतिवादी क्र.६(अ) म्हणुन दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वादीं दाव्यात दुरुस्ती करुन शोभा कातकर यांना वादी क्र.३ व वालूबाई पाटील यांना प्रतिवादी क्र.६(अ) यांना दाव्यात समाविष्ट करु इच्छीतात.

६. प्रस्तुत प्रकरणाचे अवलोकन केले असता, माझे पुर्वपीठासीन अधिकारी यांनी दिनांक २४/०४/२०१९ रोजी नि.क्र.३३ कडे या प्रकरणात मुद्दे काढलेले आहेत असे दिसुन येते. परंतु अद्याप वादींनी या प्रकरणात त्यांचा पुरावा दिलेला नाही. परिणामी, प्रस्तुत प्रकरणात संपरिक्षा सुरू झालेली नाही. प्रस्तुत अर्जान्वये वादीं हे दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार यांचा समावेश करु इच्छीतात व त्याअनुषंगाणे दाव्यातील वंशावळीमध्ये दुरुस्ती करु इच्छीतात. प्रस्तावित दुरूस्ती ही प्रस्तुत दाव्यातील वाद विषय अंतिमतः निकाली काढणेसाठी आवश्यक आहे. प्रस्तावित दुरुस्ती नामंजुर केलेस कार्यवाहींचे बाहुल्य (multiplicity of proceedings) होणार आहे. सदर दुरूस्तीमुळे मुळ दाव्याचे स्वरुपात कोणताही बदल होत नाही. परिणामी, अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**– आदेश –**

१. प्रस्तुत अर्ज निशाणी क्र.३५ मंजुर करण्यात येत आहे.

२. वादीं यांनी अर्जात नमुद केले प्रमाणे दाव्यामध्ये आवश्यक ती दुरूस्ती करणेस व शोभा संजय कातकर यांना वादी क्र.३ व श्रीमती वालूबाई नाना पाटील यांना प्रतिवादी क्र.६ (अ) म्हणुन समाविष्ट करणेस परवानगी देणेत येते.

३. वादीं यांनी दाव्यात आवश्यक ती दुरूस्ती करुन दुरुस्त दाव्याच्या प्रती पुढील तारखे पर्यंत अभिलेखावर दाखल कराव्यात.

४. दोन्ही बाजुंनी आपापला खर्च सोसावा.

सही/-
**(डि.एम.जी.मलिदवाले)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
राधानगरी

ठिकाण : राधानगरी
दिनांक :०३/११/२०२३